Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 5.355 (2019), (CIF)–4.186 (2018)
Special Issue 004- Impact of Urbanization on Socio-Economic Development in India
E-ISSN: 2455-1511
March- 2020

# कराड तालुक्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास

प्रा. एन. एस. देसाई[१]   प्रा. एस. एस. थोरात[२]

१. भूगोलशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड जि. सातारा
२. भूगोलशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड. जि. सातारा

**सारांश:**

*पर्यटन हा मानवाच्या अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय असून तो फार झपाटयाने विकसित होत आहे. पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. पर्यटनामध्ये भौगोलिक घटक महत्त्वाचे असतात. कराड हा पर्यटनाव्यादृष्टीने महत्त्वाचा आहे. वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने कराड हा राष्ट्रीय महामार्गावर असल्याने पर्यटकाच्या साठी सोयीस्कर आहे. कराडमध्ये त्या बरोबर कराडच्या आसपास अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यामध्ये धार्मिक, ऐतिहासिक व नैसर्गिक व कृषी पर्यटनस्थळांचा समावेश होतो. यामधील काही पर्यटनस्ळांचा विकास झालेला नाही. नैसर्गिक सामाजिक व भांडवलाचा तुटवडा असल्याने या पर्यटनस्ळांचा विकास झालेला नाही. शासकीय धोरण त्याचबरोबर स्थानिक प्रशासनाने पर्यटन व्यवसाया मध्ये लक्ष घातले तर या पर्यटन केंद्राचा चांगला विकास होईल.*

*बीज संज्ञा: कृषी पर्यटन ऐतिहासिक पर्यटन धार्मिक पर्यटन*

## प्रस्तावना:

पर्यटन हा त्याशतकाच्या उत्तारार्धात झपाटयाने विकसित होणारा आर्थिक व्यवसाय आहे. जागतिक पर्यटकांच्या संख्येत आणि पर्यटनापासून मिळणाऱ्या उत्पन्नात सातत्याने तसेच झपाटयाने वाढ होत आहे. जागतिक विकसित देशामध्ये अविकसित देशापेक्षा पर्यटनाचा विकास आधिक झालेला आहे. पर्यटन विकासात अनेक घटकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. यामध्ये भौगोलिक घटक प्रमुख आहेत. प्रदेशाचे स्थान व सुगमता यावर या व्यवसायाचा विकास अवलंबून आहे. दाट लोकवस्ती जवळ आलेल्या चांगली वाहतूक व्यवस्था असलेली पर्यटन स्थळे आर्थिक सुगम असल्याने झपाटयाने विकसित होतात. भूपृष्ठावरील भूदृश्ये जलविभाग व वनस्पतीच्या अस्तित्वाने निर्माण होणाऱ्या सृष्टीसौदर्याचा आस्वाद पर्यटक घेतात.

कराड तालुका हा शेती व उदयोगधंदे मध्ये एक विकसित तालुका आहे. त्याचबरोबर पर्यटन व्यवसाय हा सुध्दा एक महत्त्वाचा व्यवसाय या तालुक्यात आहे. पर्यटन व्यवसायसाठी आवश्यक असणारी भौगोलिक सामाजिक व आर्थिक घटकांचा चांगल्या प्रकारे इथे विकास झाला आहे. नैसर्गिक सृष्टीसौदर्यानी बहरलेली असा हा तालुका आहे.